PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 4, ISSUE 4

# मानव संसाधन विकासात प्रशिक्षणाची भूमिका : भूमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी विशेष संदर्भ

रोहिणी निवृत्ती पवार

रोहिणी निवृत्ती पवार
संशोधक विद्यार्थी
लोकप्रशासन विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा औरंगाबाद
(महाराष्ट्र) भारत

डॉ. भारत गोरे

सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख
लोकप्रशासन विभाग
विवेकानंद कला, सरदार दलिपसिंग वाणिज्य
आणि विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद
(महाराष्ट्र) भारत

भारतासारख्या लोकशाही देशात मानव हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. देशाच्या विकासासाठी मानव संसाधनाचा विकास अत्यंत आवश्यक आहे. प्रशासकीय व खाजगी संघटनेत तसेच उपक्रमात विविध पातळीवर कार्ये करणाऱ्या कर्मचार्यांना वर्तमानातील तसेच भविष्यकाळातील निर्माण होणार्या विविध प्रकारच्या कार्यासाठी सक्षम करण्याचे कार्य मानव संसाधन विकास प्रक्रियेत केले जाते. मानव संसाधन विकासात संघटनेतील कर्मचाऱ्यांच्या कार्यपद्धतीत अनुरूप बदल केला जातो. त्यांच्या वर्तणुकीत, दृष्टीकोनात बदल घडवून आणला जातो. सक्षम कर्मचारी तयार करणे, त्यांच्या कौशल्यात, कार्यक्षमतेत मनोबलात वाढ करणे, कार्यरत कर्मचार्यांच्या कार्यक्षमतेचा आणि कौशल्याचा विकास करून त्यांच्यात परिवर्तन करणे म्हणजेच मानव संसाधन विकास होय. प्रशिक्षण, ज्ञान, विकास या महत्वपूर्ण घटनावर भर मानव संसाधन विकासात दिला जातो. मानव संसाधन विकासात प्रशिक्षण हा महत्वपूर्ण घटक मानला जातो. प्रशिक्षणात कर्मचार्यांना तांत्रिक ज्ञान देणे, गुणवत्तेत वाढ करणे, त्यांच्या गरजांचा अंदाज घेणे, कार्यात कौशल्य प्रस्थापित केले जाते म्हणून मानव संसाधन विकासात प्रशिक्षण महत्त्वाची भूमिका पार पाडते.

**मानव संसाधन विकास आणि भूमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी**

मानव संसाधन विकास प्रक्रियेत भूमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी महत्वपूर्ण कार्य करत आहे. महसूल विभागातील वरिष्ठ अधिकारी, कनिष्ठ अधिकारी, कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्याचे कार्य भूमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी करते. सन १९८४ मध्ये भूमि संपादन प्रकरणे, भूमि संपादनाच्या कामातील विलंब टाळण्यासाठी महाराष्ट्र शासनाने एका कार्यकारी गटाची नेमणूक केली व त्या गटाच्या सूचनेनुसार शासकीय कर्मचार्यांना तांत्रिक कामाचा दर्जा आणि कार्याक्षमता यात गुणात्मक वाढ होण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महसूल व वनविभाग निर्णय क्र. इ.टी.एस.१०/५८/१४७८९/३२६/इ-६ दिनाक २१/०८/१९८५ अन्वये भूमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनीची स्थापना करण्यात आली आहे.

**भूमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनीचे उद्दिष्ट्ये :**

महाराष्ट्र शासन व वनविभाग निर्णयान्वये प्रशिक्षण प्रबोधिनीचे उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे -

१) भूमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनीमार्फत प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करून प्रशिक्षणार्थीना सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण देणे व शासनाच्या विविध योजना पूर्णत्वास नेणे.

२) भूमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनीमार्फत अधिकारी व कर्मचारी यांना मोजणीचे प्रशिक्षण देऊन जनतेच्या प्रश्नात न्याय भूमिका बजावून जमिनीसंबंधी समस्या दूर करणे.

३) NLRMP – राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण प्रकल्पांतर्गत अत्याधुनिक पद्धतीने अभिलेख तयार करण्याचे प्रशिक्षण शासकीय कर्मचारी व अधिकाऱ्यांना देणे.

४) भूमी अभिलेख विभागातील कर्मचारी व अधिकारी वर्गाला सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण देणे. या मुख्य उद्देशाने प्रशिक्षण प्रबोधिनीची स्थापना करण्यात आली आहे.

५) अद्ययावत संगणक सामुग्री, E.T.S., G.P.S., साटेलाईट इमेमरी, G.I.S. आज्ञावली तसेच आधुनिक तंत्रज्ञानाबाबत माहिती, महसूल, भूमी अभिलेख व नोंदणी विभागातील सर्व स्तरांवरील अधिकारी व कर्मचारी यांना अद्ययावत प्रशिक्षण देणे.

६) भूमी अभिलेख विभागाची कार्यक्षेत्राची व्याप्ती वाढविणे, गुणवत्ता व दर्जा वाढविणे, व्यावसायिक बदल घडवून आणणे व राज्याचा विकास साधणे.

थोडक्यात भूमी अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनीचे उद्दिष्टयानुसार कार्य पूर्ण करण्यात येते परंतु अंतर्गत व बाहय परिस्थितीनुसार उद्दिष्ट साध्य करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या नियोजनात आवश्यक वाटल्यास बदल केला जातो व त्यासंबंधीचे निर्णय भूमी अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनीचे प्रमूख प्राचार्य घेतात.

**महाराष्ट्रातील भूमी अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनीची व्याप्ती व स्वरूप :**

प्रशासकीय सेवेतील वरिष्ठ अधिकाऱ्यापासून ते कनिष्ठापर्यत सर्वांचा विकास घडवून आणण्यासाठी भूमी अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनीची व्याप्ती व स्वरूप खूप मोठे आहे. प्रशिक्षण प्रबोधिनीमध्ये प्रशिक्षणर्थीकडून केल्या जाणाऱ्या कार्याचे मूल्यमापन, प्रशिक्षण व्यवस्थापन विकास नियोजन, नवतंत्रज्ञानाचे प्रशिक्षण, व्यवस्थापन विकास संघटना, शारीरिक क्षमतेमध्ये व कौशल्यामध्ये वाढ करण्यापासून ते प्रशिक्षणार्थीच्या वर्तनामध्ये बदल घडवून आणणे त्यांचे मनोबल उंचावणे व्यवसाय किंवा उपक्रमाच्या सर्व पातळीवर संसाधन सकारात्मक वाढ करणे. त्यांना मुल्याधीष्टीत विचार करण्यात प्रोत्साहन देणे व भविष्यात अनेक समस्यावर उपाय योजण्यास सक्षमता निर्माण करणे.

भूमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनीमध्ये वरिष्ठापासून कनिष्ठापर्यंत एकूण २५ कर्मचारी वर्ग आहे. प्राचार्य हे सर्वात वरिष्ठ आहे.

**भूमी अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी प्रशिक्षण वर्ग :**

भूमी अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनीचे प्रशिक्षण वर्ग - भूमी अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनीमध्ये विविध प्रकारच्या प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करून प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण देण्याचे कार्य केले जाते आयोजित प्रशिक्षण वर्गाची माहिती पुढीलप्रमाणे –

१) सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण वर्ग - महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग निर्णय क्रमांक/परीक्षा/1177/ 100138,2393 ई-6 दिनांक 13 जानेवारी 1966 नव्याने नियुक्त झालेले व साधारणतः 1 वर्षाची सेवा झालेले वर्ग 3,4 , भूमापक, अभिलेखापाल, टंकलेखक यांना प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षण संस्था स्थापनेपासून ते मार्च 2018 अखेर प्रशिक्षण प्रबोधिनीच्या अहवालानुसार एकूण 100 सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले आहे व 6509 प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण दिले जाते

2) परिविक्षाधीन तालुका निरीक्षक भूमी अधिलेख प्रशिक्षण वर्ग - महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे खात्यात सरळ सेवा नियुक्तीने वर्ग 2 चे अधिकारी म्हणून नियुक्ती झालेल्या परिविक्षाधीन तालुका निरीक्षक यांना लेखा व आस्थापना, प्रात्यक्षिकात मोजणी, कायदा, विशिष्ट योजना याबाबत प्रशिक्षण दिले जाते प्रशिक्षण प्रबोधिनीच्या अहवालानुसार एकुण 20 प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले व एकूण 245 प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण दिले आहे

3) वर्ग 3 पद समूह 1, 2 व 3 च्या कर्मचाऱ्यांसाठी उजळणी वर्ग (सहाय्यक तालुका निरीक्षक भूमी अभिलेख) - भूमी अभिलेख खात्यात नगर भूमापक, एकत्रीकरण, भूसंपादन पोटहिस्सा इ. वेगवेगळ्या आस्थापना विषयक सर्व कामे सर्व तालुका निरीक्षक भूमी अभिलेख व त्यांच्या अधिनीस्थ कर्मचारी यांनी करावयाची आहेत म्हणून अशा कर्मचाऱ्यांना खात्यातील सर्व विभागाचे प्रशासकीय व तांत्रिक कामाचे संपूर्ण ज्ञान होणे आवश्यक आहे.

त्यादृष्टीने या प्रशिक्षण वर्गांचे आयोजन केलेले आहे. प्रशिक्षण प्रबोधिनीच्या अहवालानुसार एकूण 19 प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले आहे व एकूण 848 प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण दिले आहे

4) जमाबंदी आयुक्त व उपसंचालक भूमी अभिलेख यांच्या कार्यालयातील कार्यालय अधीक्षक यांचे प्रशिक्षण- राज्यातील सर्व कार्यालय अधीक्षक व कक्ष अधिकारी यांना 4 दिवसासाठी प्रशिक्षण दिले जाते.

अश्या प्रकारे भूमी अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनीमध्ये वेगवेगळ्या प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करून प्रशिक्षण दिले जाते त्यात भूमी अभिलेख अर्हता उजळणी वर्ग, उजळणी परीक्षण भूमापक व निमतानदार यांचे प्रशिक्षण वर्ग भूमि अभिलेख वर्ग ड मधून वर्ग क मध्ये पदोन्नतीचे प्रशिक्षण वर्ग उपजिल्हाधिकारी व तहसीलदार प्रशिक्षण वर्ग, इ.टी.एस., इ.म्युटेशन, इ governance प्रशिक्षण वर्ग, जमाबंदी उपायुक्त, उपसंचालक, अधिक्षक यांचे प्रशिक्षण वर्ग, पदोन्नत परीविक्षाधीन, उपअधिक्षक, तालुका निरीक्षक, निदेशक, सहाय्यक निदेशक, पदोन्नत उपअधिक्षक यांचे प्रशिक्षण वर्गाचे आयोजन प्रशिक्षण प्रबोधिनी करते. याप्रमाणे महसूल विभाग, भूमि अभिलेख विभागांतील वरिष्ठ, कनिष्ठाना प्रशिक्षण देण्यात येते. मार्च 2018 अखेर एकूण 498 प्रशिक्षण वर्गाचे आयोजन प्रशिक्षण संस्थेने केले असून 20,189 अधिकारी, कर्मचारी यांनी प्रशिक्षण घेतले आहे.

**भूमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनीचे आर्थिक विकासातील महत्त्व :**

भूमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनीमध्ये जमीन मोजणीविषयक, कायदेविषयक प्रशिक्षण देण्यात येते. यामुळे शासन महसूल आकारताना जमिनीची मोजणी करून महसूल आकारला जातो तसेच जनतेचे जमिनीविषयक समस्या सोडविण्यासाठी भूमि अभिलेख विभागात व्यक्तीला जमीन मोजणीविषयक अर्ज दाखल करून विभागाची फिस भरावी लागते. नंतर जमीन मोजणी केली जाते. प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेतल्यानंतर जनतेची जमीन मोजणी, अभिलेखविषयक समस्या सोडवितात व त्यामुळे शासनाला आर्थिक सहाय्य प्राप्त होते.

**तक्ता क्र. १**

**भूमि अभिलेख विभागाने केलेल्या कार्यामुळे शासनास प्राप्त उत्पनाची माहिती पुढील तक्त्यावरून लक्षात येते**

| उत्पन्नाची बाब | वर्ष २०११-१२ | वर्ष २०११-१२ | वर्ष २०१३-१४ | वर्ष २०१४-१५ | वर्ष २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|
| शहर भूमापन | ९९,१२८ | १६,१८२ | १९,५८६ | ३८,९५७ | १,८५,५५० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पोट हिस्सा मोजणी | १,४३,२९४ | १,१७,०२१ | १,४८,९९६ | ४५,२१५ | ८६,६०८ |
| नगर भूमि अभिलेख | ३२,९३६ | ६०,१०२ | ४,९३,५१२ | ६,८९,९१८ | ३,१०,३०३ |
| अभिलेखाचे परीक्षण | ९,५०,३८३ | ५,१६,७६४ | ९,०५,८१२ | - | - |
| पुनर्मोजणी | १२५ | - | १२५ | - | - |
| अभिलेखाच्या आधारे मोजणी व हद्द मोजणी | - | - | १३,३९,३२८ | ९८,१३,३३३ | ९,६२,६१७ |

(स्त्रोत : महसूल व वन विभाग (भू.अ.) अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक)

उपरोक्त तक्त्यावरून विभागीय कर्मचार्यांनी, अधिकाऱ्यांनी केलेली कार्य व शासनास प्राप्त झालेला महसूल याबाबत माहिती मिळते. या माहितीवरून कर्मचार्यांची वरिष्ठ अधिकारी, कनिष्ठ अधिकारीची कार्यपद्धती लक्षात येते व त्यावरून प्रशिक्षण वर्गाचे आयोजन भूमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी करते.

**सारांश :**

भूमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनीच्या प्रशिक्षण पध्दती, प्रशिक्षण वर्गाच्या क्रियाशीलतेमुळे भूमि अभिलेख विभागाच्या कार्याला गती मिळाली आहे. प्रशिक्षण प्रबोधिनीच्या स्थापनेनंतर प्रशासकीय अधिकारी, कर्मचार्यांच्या विकासाची जबाबदारी प्रशिक्षण संस्थेने प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करून स्वीकारली आहे. वार्षिक प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन करून अधिकारी कर्मचार्यांचा विकास घडवून आणण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. बदलत्या काळानुसार भूमि अभिलेख विभाग विज्ञान व तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आधुनिक तंत्राचा उपयोग करून कार्य करत आहे याचा अधिक लाभ ग्रामीण, शहरी भागातील जनतेला झाला आहे. त्यामुळे विभागांतील कर्मचार्यांची, अधिकारीची जबाबदारी वाढली आहे. प्रशासकीय कर्मचाऱ्यांची जबाबदारी वाढली आहे. प्रशासकीय कर्मचारी जबाबदारी पार पाडण्यास त्यांना कार्यक्षम बनविण्यासाठी संपूर्ण कार्य भूमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनीला करावे लागते.

## संदर्भ –

1) पाटील वा. भा., "प्रशासकीय व्यवस्थापन", श्री मंगेश प्रकाशन, नागपूर

2) महाराष्ट्र शासन परिपत्रक महसूल व वन विभाग निर्णय क्र. E S T/1058/14789/326/ई 6 दिनांक 21/08/1985

3) काळे बाबासाहेब, " भूमी अभिलेख प्रशिक्षण संस्था : एक दृष्टिक्षेप" विलास पाटील संचलित "भूमीतरंग" भूमी अभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन पुणे, सप्टेंबर 2011

4) भूमी अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी कार्यालयीन दस्तऐवज

5) भूमी अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी वार्षिक अहवाल

6) महसूल व वन विभाग अर्थसंकल्प २०११-१२

7) महसूल व वन विभाग अर्थसंकल्प २०१२-१३

8) महसूल व वन विभाग अर्थसंकल्प २०१३-१४

9) महसूल व वन विभाग अर्थसंकल्प २०१४-१५

10) महसूल व वन विभाग अर्थसंकल्प २०१५-१६